ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# "जागतिकीकरणाच्या प्रभावाचे मराठी साहित्य"

**डॉ. प्रीती किशोर उमाठे**
मराठी विभागप्रमुख
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर.

★★★

आजचा काळ हा जागतिकी करणाचा आहे. आपले जीवन आपले भावविश्व आणि आपला समाज जागतिकीकरणाच्या संज्ञेत बद्ध झालेला आहे १९९१ मध्ये भारताने जागतिकीकरणाचा स्विकार करुन आपल्या आर्थिक धोरणांना नवे रूप दिले. त्याचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर अधिक झाला माणसाला माणुस म्हणून जगण्यासाठी करावी लागणारी धडपड करूनही त्यांच्या समस्या वाढतच गेल्या. साहित्य हे समाजाचे एक महत्वपूर्ण अंग आहे. जागतिकीकरणाच्या कच्चाटातून साहीत्य ही सुटले नाही. मराठी साहित्यावरही जागतिकीकरणाचे परिणाम होऊन नव्या अंगाने ते लिहिले जाऊ लागले. माणसाच्या जगण्याच्या मुलभूत प्रश्न साहित्य मांडू लागले. मराठी जागतिकीकरणाने स्थित्यंतर घडून आल्याचे जागवू लागले. त्यामुळे नव्या जीवन जाणिवा निर्माण होऊन साहित्य पुढे येऊ लागते त्याची समिक्षा होऊ लागली. जागतिकीकरणाची संज्ञा आर्थिक स्तरांबरोबरच धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङमयीन असा बहुविध क्षेत्रात बाधित करणारी अशी शक्तीमान, सामर्थ्यशाली संज्ञा आहे. जागतिकीकरण ही एक प्रक्रिया असुन तिचा संबंध मानवी जीवनाषी संस्कृतीशी आहे. जागतिकीकरणातून नव्या वसाहतवादी संस्कृतीचा जन्म झाला. संपूर्ण समाज जीवन ढवळून टाकणारी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा मराठी साहित्यावर परिणाम कसा झाला. याचा आढावा प्रस्तुत शोधप्रबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणाच्या चर्चा सुरु झाल्या तेव्हा त्याच्या कशा कशावर परिणाम होईल यांची चर्चा सुरु झाली. नव्वदीला आम्ही नवे आर्थिक धोरण स्विकारले मुक्त धोरणाचा पुरस्कार केला. विविध सेवाक्षेत्रात खुलेपना आला. नागरिकीकरणाचे साहित्यावर काय परिणाम झाले होतात यांची वेगवेगळया ठिकाणी चर्चा सुरु झाली जागतिकीकरण म्हणजे काय? त्यांचे स्वरूप कसे असते व त्यांचा समाजावर व साहीत्यावर परिणाम कसा होतो.

**जागतिकीकरण म्हणजे काय** – डॉ. मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री असताना त्यांनी अमलात आणलेल्या नविन आर्थिक धोरणांमुळे १९९१ मध्ये भारतातील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली त्यांच्या धोरणांना L.P.G. असे म्हटले गेले. 'एल' म्हणजे लिवलायझेशन म्हणजेच उदारीकरण आणि 'पी' म्हणजे प्रायव्हेटायझेशन म्हणजेच खाजगीकरण आणि 'जी' म्हणजे ग्लोबलायझेषन म्हणजेच जागतिकीकरण या तीन नवीन धोरणामूळेच भारतीय अर्थव्यवस्थेला जणु मोकळे आकाशच भांडवल आणि स्त्रोत आकृष्ट करण्यासाठी खुले वातावरण, आणि उदयोग सुरु करण्याची सुलभता उपलब्ध झालेल्या आहेत. अशा जागतिकीकरणाची व्याख्या काही अभ्यासकांनी दिलेला आहे.

**1) मार्टिन आलब्रो आणि एलिझाबेध किंग** :–"ज्यामुळे जगातील लोक एकाच वैष्विक समाजाचे महत्त्व बनतात अशा सर्व प्रक्रियांचा संदर्भ जागतिकीकरणाशी जोडलेला आहे."

**2) ॲन्थनी गिडेन्स** – "ज्यामुळे दुरावस्था प्रदेशांनी असलेले नाते अशा पध्दतीने जोडले जाते कि अनेक मैल दूर असलेल्या प्रदेशात घडणाऱ्या घटनांचे पडसाद स्थानिक घटनावर होतात आणि त्याच न्यायाने स्थानिक घटनांचा परिणाम जागतिक पातळीवरील घटनांवर होतो ती प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण" वरील व्याख्यावरून आपल्या लक्षात येते कि जागतिकिकरण, उदारीकरण आपल्या लक्षात येते. जागतिकीकरण याचा सरळ अर्थ 'मुक्तव्यापार' असा होतो. या प्रक्रियेत अमेरिका युरोपीय देश यांची मक्तेदारी असून त्यांनी आपला नवा साम्राज्यवाद जागतिक पातळीवर पसरविला आहे. याचे परिणाम, विकसनशील राष्ट्रातील साहित्य, कला, संस्कृती व समाज अशा सर्वच पातळीवर झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्यावरही जागतिकीकरणाचा परिणाम झाला आहे. साहित्य व समाज यांचा अनोखा असा संबंध आहे. जे समाजात निर्माण होत असते तेच साहित्यात येत असते. साहित्य समाज अनुभवातून जन्माला येऊन समाजाचे वस्तुरूप दर्शन प्रश्न आणि समस्या यांच्यासह घडवित असते मराठी साहीत्यं 1990 नंतरच्या काळात जे निर्माण झाले ते जागतिकिरणाच्या प्रवाहातून झालेले आहे त्याचा विचार या ठिकाणी करणे महत्वाचे आहे.

**जागतिकिकरण आणि मराठी कथा व कविता**– जागतिकीकरणाने मराठी माणसाचे अंर्तबाहय जीवन ढवळून निघाले आहे. त्याने अनेक स्थिततरे मराठी साहित्यात घडून आली. माणसाचे जीवन गुंतागुतीचे बनले नव्या जाणीवा निर्माण झाल्या. त्यामुळे मराठी साहित्य नवा चेहरा, नवे अंतरंग घेऊन पुढे येऊ लागले याला मराठी कथाही उपवाद ठरली नाही. सदानंद देशमुख यांनी 'लचांड' आणि उठावण या कथासंग्रहातून बदलेल्या गावांचे चित्रण रेखाटले आहे. श्रीराम गुंदेकर यांनी 'उचल' या कथासंग्रहातून सावकारही तिला बळी पडणारे श्रमिक, वेठविगारी यांचे चित्रण केले आहे. राजेन्द्र महाळ यांच्या कोंडी, सतिश तराळ यांचा 'लढा' या कथा संग्रहातून बदलत्या परिस्थितिचे चित्रण प्रत्यकारीपणे झाल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणाने गावांचा विकास झाला. असे वरवर दिसत असले तरी गावे उजाड बनली हे वास्तव आहे. गावगाडयाचे स्वरूप बदलून गेले. स्वावलंबी असलेले गावे परावलंबी बनली गरीब माणसाला जगणे मुश्कील झाले. ग्रामसंस्कृतीला तडे गेले. आलुतेदार आणि बसुतेदार गोंधळून गेले जागतिकीकरणाने खेडयातील नात्यातला जिव्हाळा संपूर्ण कृत्रिमता आली शेतीवर जीवापाड प्रेम करणाऱ्या शेतकऱ्याला मुलगा शेती विकायला सांगु लागला आलेल्या पैशातून पान तंबाखुची टपरी, मोबाईल शॉप काढू लागला नाही तर ढाबा टाकण्याची विपरीत बुध्दी तरूणांना सुचू लागली हे सर्व जागतिकीकरणाच्या प्रभावातून घडत होते. या सर्वांना कवींनी आपल्या कवितांमधून शब्दबध्द केले आहे. मराठी कवितेत जागतिकीकरणाचे वारे वाहू लागते. इंद्रजित भालेराव (टाहो) या संग्रहातील एका कवितेत म्हणतात.

"जागतिकीकरणाचा एन्ड्रीन डबा
कुणी धुतला माझ्या निर्मळ गंगेत
निरागस विहार करणाऱ्या नौकात
कुणी आणून ओतला अचानक आकांत"

बदलल्या व्यवस्थेलाच कवी इंद्रजित भालेराव प्रश्न विचारतात जागतिकीकरणाचा विषारी डबा कोणी आणला आहे? देशात अनेक समस्या असतांना गरिबांसाठी नसलेल्या जागतिकीकरणाचा अनेक समस्या निर्माण केल्या. जागतिकीकरणामुळे गावांची होणारी वाताहात सदानंद देशमुख यांनी 'गावकळा' या काव्यसंग्रहातून मांडली आहे जागतिकीकरणाने गावापर्यंत पोहचलेली मीडियासारखी साधने यातील मनोरंजनाने तरूण तरूणींची वर्ग शेती कामाकडे दूर्लक्ष करू लागला. जागतिकीकरणाने कंथबुडे मोडलेल्या शेतकऱ्याचे दुःख भगवान ढग यांनी 'अन्यदात्याची मुळाक्षरे' या काव्य संग्रहात अभंग शैलीत मांडली आहेत.

**समारोपः—**

जागतिकीकरण हे आजच्या जीवनशैलीचे अखिल असे वास्तव झालेले आहे. आदिवासी, ग्रामीण, शहरी संस्कृती पर्यंत जागतिकीकरणाचा विळखा मानवी जीवनाला घटटपणे बसलेला आहे. सर्वसामान्य मानसाच्या विचार प्रक्रियेपासून त्यांच्या जीवन प्रक्रियेपर्यंत जागतिकीकरणाचे प्रभुत्व प्राधान्याने जाणवत्यावाचून राहत नाही. मानवी मुल्यधारेशी संबंधित असलेल्या समाजकारण, राजकारण, ध र्मकारण, शिक्षण संस्कृती आणि साहीत्यकारण इत्यादी अंगावर जागतिकीकरण धो.धो. कोसळत आहे. जागतिकीकरणाचा प्रभावाचा वेध मराठी साहित्यामध्ये घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष :—**

1. जागतिकीकरण ही एक प्रक्रिया आहे.
२. १९९१ मध्ये गॅट करारावर सही करून भारताने खुले आर्थिक धोरण स्विकारले
3. जागतिकीकरणातून नव्या आर्थिक वसाहतवादी संस्कृतीचा जन्म झाला.
4. जागतिकीकरणाने खेडयांचे रूप बदलते. रस्ते, विज, पाणी, करमणूकीची साधने, सुविधा आपल्या परंतु खेडीही वकास बनत गेली.
5. शेती मालाला हमी भाव मिळत नसल्याने शेती व्यवसाय तोटयात जाऊ लागला. खते, बी, बीयाणे यांच्या किमती सतत वाढत राहील्या.
6. जागतिकीकरणाने माणसाचा चेहरा हरवला.
7. जागतिकीकरणाने मराठी साहीत्यात स्थित्यंतरे घडून आले. वास्तव परिस्थितीच्या रेखाटनाला प्राधान्य मिळाले नव्या जाणीवा साहीत्यात अवतरल्या.

***संदर्भग्रंथ***

1. *मुलाटे वासुदेव :— "ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा" स्वरूप प्रकाशन औरगांबाद, प्रथम आवृत्ति 2002.*
2. *नेमाडे भालचंद्रएः— "साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण, लोकवाङमय" गृह. मुंबई, सहावी आवृत्ती 2009.*
3. *रंगनाथ पठारे, "जागतिकीकरण आणि देशीवाद, लोकवाङमय" गृह मुंबई, पाचवी आवृत्ती 2009.*